**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९४/२०१८** **दिनांक २२/११/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/११/२०१८ ते २२/११/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३ /११/२०१८ सकाळी ८:३० पासून २७/११/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/११ | १७/११ | १८/११ | १९/११ | २०/११ | २१/११ | २२/११ | | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३४.६ | ३५.६ | ३४.० | ३३.६ | ३१.२ | ३४.२ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| १४.० | १५.० | १७.० | २०.० | २२.० | २१.५ | १९.० | किमान तापमान (अं.से) | २३ | २४ | २२ | २२ | २२ |
| ० | ० | ० | २ | ४ | २ | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ४ | ७ | ५ | ० |
| ८९ | ८८ | ९० | ९१ | ८६ | ९० | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६६ | ६६ | ६८ | ५८ | ५९ |
| ६७ | ६३ | ५८ | ६० | ७४ | ६४ | ६४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४९ | ५४ | ४१ | ४३ | ४२ |
| ०.९ | ०.८ | ०.७ | ०.८ | ०.८ | १.३ | ०.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | ७ | ७ | ७ | ८ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३०७१.८ | ३६३३.५ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २३ ते २६ नोव्हेंबर २०१८ पर्यंत आकाश अंश:ता मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पूर्व मशागत | • उन्हाळी भात रोपवाटिकेसाठी १ मी. X १० मी. अंतराचे गादीवाफे तयार करावे. वाफ्यांना प्रती आर शेत्रास १ किलो युरिया व ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे.<br>• उन्हाळी भात लागवडीसाठी कर्जत-१८४, रत्ना, रत्नागिरी-१, रत्नागिरी-७४, रत्नागिरी-२४, रत्नागिरी-७११, कर्जत-१, कर्जत-३ या जातींचे बियाणे वापरावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती आर शेत्रावर ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| भुईमुग | पूर्व मशागत | • रब्बी भुईमुग लागवडीसाठी एस बी. ११, टी.ए.जी.- २४, फुले प्रगती, कोंकण गौरव, टी. जी. २६, कोंकण ट्रोम्बे टपोरा या जातींचे बियाणे १२५ ते १५० किलो प्रती हेक्टरी वापरावे.<br>• मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बियाणास थायरम २.५ ग्रम प्रती किलो या प्रमाणात चोळावे. |
| आंबा | पालवी | • आंब्याच्या नवीन पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. या रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण किंवा ०.२५ टक्के कॉपरऑक्झीक्लोराइड २५ ग्रॅम किंवा ०.१ टक्का कार्बेन्डाझीम १० ग्रॅम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारावे.<br>• आंब्याच्या कोवळ्या पालवीवर फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट १५ मि.ली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी पानाच्या खालच्या बाजूवर पडेल याची दक्षता घ्यावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.) |
| काजू | मोहोर अवस्था | • काजूमध्ये मोहोर फुटण्याच्या अवस्थेत ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही प्रोफेनोफोस ५० टक्के १० मि. ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून दुसरी फवारणी मोहोर फुटण्याच्यावेळी करावी. |
| नारळ | फळधारणा | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत.<br>• नारळाच्या आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | पुनर्लागवड | • कोबी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ४५ x ४५ से.मी. किंवा ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४० किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.<br>• टोमेटो, वांगी, मिरची पिकांमध्ये सुत्रकृमी व फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी पिका भोवती झेंडूच्या सापळा पिकाची लागवड करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी चारा चवळी, मका या पिकांची लागवड करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**